


# यावल कॉलेजमध्ये वाणिज्य मंडळाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**यावल :** येथील, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात नुकतेच वाणिज्य व अर्थशास्त्र मंडळाचे उद्घाटन पंचायत समिती सदस्य सुहास कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी डी. एन. मोरे होते.

कुलकर्णी यांनी कोरोनानंतरची भारताची आर्थिक स्थिती कथन करत ही स्थिती सुधारण्यासाठी सर्व स्तरावर सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. सूत्रसंचालन उपप्राचार्य व अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. ए. पाटील यांनी, तर आभार छत्रसिंग वसावे यांनी मानले.

कार्यक्रमास प्रवीण पाटील, सी. के. पाटील, डॉ. एस. पी. कापडे व विद्यार्थी उपस्थित होते.